अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



# उद्यान विभागातील कर्मचाऱ्याचा कार्यालयात आत्महत्येचा प्रयत्न

- वेळीच रोखल्याने मोठा अनर्थ टळला
- महापालिका वर्तुळात उडाली खळबळ

**सोलापूर/प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून काम करताना कार्यालयात त्रास होत असल्याने आणि अशातच वरिष्ठांनी कारणे दाखवा नोटीस काढल्याने सोलापूर महापालिकेतील उद्यान विभागातील एका लिपिकाने अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी वेळीच त्यास रोखल्याने अनर्थ टळला. या घटनेमुळे महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे.



ही घटना शुक्रवारी दुपारी रामलाल चौक परिसरातील शाळेच्या कंपाउंडमधील उद्यान विभागाच्या कार्यालयात घडली. भीमाशंकर सरसंबी असे त्या आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या कर्मचाऱ्यांचे नाव आहे. सरसंबंबी हे महापालिकेतील उद्यान विभागात गेल्या दोन वर्षापासून कार्यरत आहेत. उद्यान विभागात नुकतेच झालेल्या भरती प्रक्रियेतून उद्यान अधीक्षक आणि सहाय्यक अधीक्षक अशी पदे भरली आहे यामुळे या दोन्ही पदावर नवनियुक्त अधिकारी हे काम पाहत आहेत.

कार्यालयाने दिलेल्या कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी उद्यान विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सरसंबी यांना कारणे दाखवा नोटीस काढली होती. याची माहिती मिळताच सरसंबी यांनी शुक्रवारी दुपारी चिडून कार्यालयातील सर्व सेवकांना कार्यालयाबाहेर काढून आत मध्ये स्वतःला कोंडून घेतले यानंतर त्याने सोबत आणलेल्या पेट्रोल ची बाटली अंगावर ओतून स्वतः ला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, हा प्रकार निदर्शनास येताच उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी लागलीच दरवाज्याची कडी तोडून आत जाऊन त्यांच्या हातातील पेट्रोलची बाटली काढून घेतली आणि त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर उभे केले. कर्मचाऱ्यांच्या प्रसंगावधानाने हा प्रकार रोखला जाऊन होणारा अनर्थ टळला.

त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सतत वरिष्ठांकडून त्रास देण्यात येत असल्याने व ते असेही झाल्यानेच आपण हे कृत्य केल्याचे सांगितले.

### नोटीस काढली; पण दिली नव्हती

सरसंबी यांच्याकडून कामात हलगर्जीपणा होत होता. वारंवार त्यांना कार्यालयातील अधिकाऱ्यांनी तंबी दिली होती तरीदेखील त्यांच्यामध्ये बदल होत नव्हते. यामुळे केवळ त्यांना समज मिळावी यासाठी कारणे दाखवा नोटीस काढी होती. ती अद्यापही बजावण्यात आलेली नव्हती. कदाचित यासंदर्भात कार्यालयात त्यांना याची माहिती मिळाली असावी असे बोलले जात आहे.

# सुवर्ण मध्य कोण आणि कसा साधणार?

**सोलापूर/प्रतिनिधी**

**खासदार प्रणिती शिंदे यांचा होमपीच मतदार संघ म्हणून उभ्या महाराष्ट्रभर परिचित असलेल्या सोलापूर शहर मध्य मतदार संघात प्रणिती शिंदे यांचा उत्तराधिकारी आमदार कोण? याबद्दल औत्सुक्य मोठे असताना या मतदार संघावर पक्ष आणि उमेदवाऱ्या यासंबंधीचे सावट अद्याप कायम आहे. महाविकास आघाडीच्या जागा वाटपात काँग्रेसकडे असलेल्या या मतदार संघात काँग्रेसचे राष्ट्रीय नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे हे पिता-कन्या या पक्षाच्या उमेदवारीसाठी कोणाच्या पाठीवर समर्थनाचा 'हात' देतात? यासंबंधी उत्सुका शिगेला पोचली असली तरी निर्णय मात्र गुलदस्त्यात आहे. काँग्रेसचे गोटामध्ये यावरुन प्रचंड तर्कवितर्क लढवले जात आहेत.**



विशेष म्हणजे या मतदार संघात मुस्लीम मतदारांची संख्या मोठी आहे. एमआयएम पक्षाने फारुक शाब्दी यांना या खेपेसही या मतदार संघातून उमेदवारी दिली आहे. एमआयएम पक्षाच्या उमेदवारासोबत फाईट देण्याला मुस्लीम चेहराच काँग्रेस दिला जाणार का? आणि जर का या समाजाचा चेहरा देण्याचा निर्णय घ्यायचा म्हटले तर इच्छुकांपैकी कोणता तुल्यबळ चेहरा देणार, या प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीतच राहात आहेत. महायुतीमध्ये शहर मध्यची जागा शिवसेनाकडे आहे. तेव्हा या पक्षाच्यावतीने कोणता चेहरा आखाड्यात उतरविला जाणार याचीदेखील उत्सुकता ताणली गेली आहे. उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रमुख असलेल्या शिवसेनेकडून मशालीच्या चिन्हावर लढण्यासाठी अस्मिता गायकवाड तसेच प्रा. अजय दासरी इच्छुक असल्याचे सांगण्यात आले.

### शिवाजी सावंत, काळजें, वाघमारेंचे लॉबींग

एकनाथ शिंदे शिवसेना गटाकडून शहर मध्यच्या जागेवर दावा करण्यात आला आहे. या गटाच्या प्रदेश प्रवक्त्या तथा प्राध्यापक ज्योती वाघमारे आणि प्रा.शिवाजी सावंत तसेच मनिष काळजे यांचे या मतदार संघातून लढण्यासाठी जोरकस प्रयत्न सुरु आहेत. भाजप इथली जागा स्वत:कडे घेणार का? यावर शिंदे सेना गटामधील इच्छुकांच्या लढण्याचे भवितव्य राहाणार आहे.

### 'माकप'विषयीचा निर्णय गुलदस्त्यातच

सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मदत केल्याच्या बदल्यात आता विधानसभेला शहर मध्य मतदार संघातून मदत करण्याची आग्रही मागणी माकपची काँग्रेसकडे आहे. माजी आमदार आडम मास्तर यांनी निवडणूक लढविण्याची तयारीदेखील केली आहे. मात्र, काँग्रेसने मदत करण्याची भूमिका गुलदस्त्यातच ठेवली आहे. त्यातून मोठा संभ्रम आहे.

### मतदारसंघ ताब्यात घेण्याला शरद पवार गट आग्रही

काँग्रेसच्या ताब्यात असलेला हा मतदार संघ ताब्यात घेण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट अग्रेसर आहे. तौंफिक शेख, ॲड. यू.एन. बेरिया, प्रमोद गायकवाड, वंदना भिसे या निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत.

### काँग्रेसकडून लढण्यासाठी उदंड इच्छुक पण...

शहर मध्य मतदार संघातून काँग्रेसच्या उमेदवारीवर लढण्यासाठी चेतन नरोटे, संजय हेमगड्डी, फिरदोस पटेल, देवेंद्र भंडारे, अंबादास करंगुळे आदी इच्छुक आहेत. पण शिंदे पिता-कन्या कोणाच्या नावाला पसंती देणार? हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे.

### भाजपाचीही मोर्चेबांधणी

शिवसेनेकडे असलेला हा मतदार संघ भाजपकडे घेण्याच्यादेखील मोठ्या हालचाली सुरू आहेत. कोठे परिवारातील युवा नेतृत्व आणि माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी याच धर्तीवर या मतदार संघात मोठी मोर्चेबांधणी करत भाजपाच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढविण्यासाठी सज्जता ठेवली आहे. महापालिकेतील पक्ष नेते तथा भाजपचे ज्येष्ठ नेते पांडुरंग दिड्डी तसेच अंबादास गोरंटला यांनीदेखील या मतदार संघातून लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

# अजितदादांना आणखी एक धक्का; डॉ.राजेंद्र शिंगणे पवार गटात



**मुंबई** : ऐन निवडणुका जाहीर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्क्यावर धक्के बसत असल्याचं पाहायला मिळत आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा पक्ष प्रवेश शनिवारी मुंबईत शरद पवार, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यामुळे अजित पवारांना ऐन निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे.

गेल्या काही दिवसांपासून डॉ.राजेंद्र शिंगणे हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. तसेच ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चाही होती. डॉ.राजेंद्र शिंगणे हे सिंदखेडराजा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. शिंगणे पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर आता त्यांना सिंदखेडराजामधून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे.

# कुत्र्याच्या अंगावर टेम्पो घातल्याने मारहाण

**सोलापूर** : कुत्र्याच्या अंगावर टेम्पो घातल्याच्या कारणावरून ड्रायव्हरला काठी आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना तळेहिप्परगा (ता.उत्तर सोलापूर) येथील



गणपतीघाट जवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. आसिफ रमजान शेख (वय ४० रा.तळेहिप्परगा) असे जखमी झालेल्या टेम्पो चालकाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. असिफ शेख हा सकाळी नऊच्या सुमारात आपला मालवाहतूक टेम्पो घेऊन घरापासून निघाला होता. काही अंतरावर कुत्रा आडवा येऊन मागच्या चाकाखाली सापडला होता. टेंपो थांबवून तो कुत्र्याला पाहण्यासाठी गेला होता . त्यावेळी अनिल विटकर आणि अमर विटकर या दोघांनी त्याला मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# पेनूर टोलनाक्यावर दोन गटात हाणामारी



**मोहोळ** : पैसे भरण्याच्या कारणावरून टोल नाका कर्मचारी आणि वाहनधारकांच्या दोन गटात हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी परस्पर विरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील २१ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात पेनुर टोळनाका कर्मचारी तुकाराम दत्तात्रय क्षीरसागर (रा.पेनूर, ता. मोहोळ) याने दिलेल्या फिर्यादीवरून वाहनातील अक्षय शिंदे, सौरभ पाटोळे, शुभम रानगट, पवन घाडगे, दिलीप गोडसे (सर्व रा.पंढरपूर आणि अन्य ७ अशा १२ जणांवर पोलिसांनी तोडफोड आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला. त्या सर्वांनी म्हणून टोळ नाका येथे वाहनाची पावती फाडण्याच्या कारणावरून बेकायदेशीर जमाव जमवून कर्मचाऱ्यांना काठी,दगडाने मारहाण केली आणि बुथची तोडफोड करून ६० ते ७० हजारांचे नुकसान केले. असे क्षीरसागर याच्या फिर्यादीत नमूद आहे. तर पवन गोपाळ घाडगे (वय ३२ रा. नागालँड चौक, पंढरपूर) या वाहनधारकांने दिलेल्या फिर्यादीवरून टोळ नाक्यातील विजय जाधव, अनिल चौरे, मधुसूदन ललाटे (सर्व रा.पेनूर, ता .मोहोळ) कैलास जाधव (रा.पंढरपूर) आणि अन्य पाच अशा एकूण ९ जणाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गुरुवारी रात्रीच्या सुमारास पैसे भरण्याच्या कारणावरून टोलनाक्यातील वरील इसमांनी बेकायदेशीर जमाव जमून वाहन चालक आणि त्यांच्या साथीदारांना काठी लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. असे घाडगे याच्या फिर्यादीत नमूद आहे. या गुन्ह्याचा तपास हवालदार नाळे करीत आहेत.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**कुर्डुवाडी/प्रतिनिधी**

मामी बरोबर शेतात म्हशी चारण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलीच्या मामाच्या शेताजवळ (ता.माढा) येथे घडली. याबाबत संशयित विवेक उर्फ विकी रामहरी चव्हाण यांच्या विरुद्ध कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार विरोधी कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी मामी बरोबर शेतात म्हशी चारण्यासाठी शेतात गेली होती. आरोपी विवेक याने येथे म्हशी चारु नका म्हणून पीडितेच्या मामीला शिवीगाळ केली. यावेळी पीडितेने शिवीगाळ करु नका असे म्हटल्यावर आरोपीने मुलीचा हात पकडून लज्जा वाटेल असे वर्तन केले. तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सारिका गटकूळ करीत आहेत.

# हिरज येथे १ लाख ७५ हजारांचे दागिने पळविले

**सोलापूर** : बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह १ लाख ७५ हजार रुपये किमतींचे दागिने पळविले. ही चोरी हिरज (ता.उत्तर सोलापूर) येथे शुक्रवारी घडली. या प्रकरणी संजय अंबादास पाटील (रा. हिरज) यांनी सोलापूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. संजय पाटील गुरुवारी रात्री घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. पहाटेच्या सुमारास चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत लोखंडी कपाटातील ४० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच २५ हजाराची रोकड घेऊन पोबारा केला. तपास फौजदार बनसोडे करीत आहेत.



सोलापूर : विद्यार्थ्यांची तपासणी करताना डॉक्टर. सोबत डॉ. जानवी माखिजा, सुनिल दावडा.

# रोटरी क्लब ऑफ नॉर्थतर्फे आरोग्य तपासणी

**सोलापूर** : रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ आणि जिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये ६५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये वजन, उंची तसेच रक्ताचे नमुने घेण्यात आले. जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा समन्वयक स्मिता भोसले यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी रोटरी नॉर्थच्या अध्यक्षा डॉ. जानवी माखिजा यांनी त्यांचा सत्कार केला. तर त्यांचे सहकारी वडतीले आणि अमर माने यांचा सत्कार शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केला. मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी शाळेची माहिती सांगितली. सचिव सुनील दावडा यांनी मानले. सूत्रसंचालन सुप्रिया माने यांनी केले. या कार्यक्रमास बळीराम पावडे, विजया पिटाळकर, योगिता बोधले, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, अजित पाटील, आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, प्रद्युम्न माने, दीपक भोसले, गंगाधर मदभावी, साहेबगौडा पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, शबाना शेख आदी उपस्थित होते.

# कोगनुरे यांनी घेतली राज ठाकरेंची भेट

## तर्क-विर्तकांना आले उधाण

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

दक्षिण मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून १५ पेक्षा जास्तजण इच्छुक आहेत.परंतु सिद्धेश्वर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी मैदानात उडी घेतल्याने अनेक इच्छुकांच्या आशेवर पाणी फिरले गेले आहे. त्यामुळे आता इच्छुकांची चलबिचल होत आहे. अशातच काँग्रेसकडून इच्छुक असलेले एम. के. फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

लोकसभा निवडणुकीदरम्यान कोगनुरे यांनी प्रणिती शिंदे यांना खासदार करण्यासाठी ताकद लावली होती. मात्र काडादी हे मैदानात आल्याने त्यांचाही अपेक्षाभंग झाला आहे. मरत्र काही करून विधानसभा निवडणूक लढवायची असा चंग बांधला आहे. त्यामुळे मुंबईमध्ये महादेव कोगणुरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. या भेटीचा फोटो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. महादेव कोगनुरे यांची ही केवळ भेट होती की भविष्यात काँग्रेस कडून उमेदवारी न मिळाल्यास ते मनसेकडून निवडणूक लढवतात का? असा प्रश्न आता या भेटीने उपस्थित होत आहे.



मुंबई : कोगनुरे यांनी राज ठाकरेंची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

# कॉटवरून पडलेल्या जखमी युवकाचा मृत्यू

**सोलापूर** : आजारी अवस्थेत कॉटवरून पडून जखमी झालेले निलेश राजू तेलकर (वय ३५ रा. भवानीपेठ, घोंगडे वस्ती) हे उपचारादरम्यान शुक्रवारी सायंकाळी मयत झाले.

निलेश तेलकर हे आजारी असून ते ९ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास पलंगावरून खाली कोसळून जखमी झाले होते. त्यांना शारदा (आई) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.उपचारा दरम्यान तिथे शुक्रवारी सायंकाळी मयत झाले. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज त्यांनी पुन्हा पक्ष बदलला!!

कल्याण
127-07-124

'प्रिसिजन फाऊंडेशन',
आयोजित...
PRECISION FOUNDATION
प्रिसीजन गप्पा
पर्व १६ वे
रविवार दि. २० ऑक्टोबर २०२४
पारंपारिक अभंगांना नव्या पिढीच्या नव्या भाषेत अर्थात फ्यूजन संगीताचा आधुनिक वाद्यसंगीताचा साज देत सादर होणारा भन्नाट कार्यक्रम
ABHANGA REPOST
'अभंग रिपोस्ट'
- प्रतिश मस्के — गायन आणि ध्वनिक गिटार
- अजय वाव्हाळ — इलेक्ट्रीक गिटार
- पियुष आचार्य — हार्मोनियम
- विराज आचार्य — तबला आणि तालवाद्य
- दुष्यंत देवरूखकर — ड्रम्स
- स्वप्निल तर्फे — बेस गिटार
वेळ : सायं. ६.२५ वा. । स्थळ : शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर
Soham Ads